[ अंक २ रा. वर्ष २५ वें ]

# "श्री साईलीला"

त्रैमासिक



एप्रिल. मे. जन १९४८.

# श्री साई लीला

## श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुपपार्श्वतो योजनैकम् ।
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्या निशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मै साक्षद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

वर्ष २५ ] त्रैमासिक – जून १९४८ [ अंक २ रा.

## संपादकीयः—

सर्व साईभक्तांस माझी नम्र विनंति आहे कीः —उत्तमांतलें उत्तम असें जें प्रेम त्याची देवघेव करून जग.च्या जंगलांत मंगल करूं. प्रेम ही परमेश्वरानें मानवाला दिलेली अमोल देणगी आहे. आपमानाच्या आंचेवर आपलेपणाचा ओलावा असणें हें अमोघ औषध आहे.

### जगीं सर्व सूखी असा कोण आहे ?

सुखदु:खाचे, मानापमानाचे, गरीब श्रीमंतीचे, खऱ्याखोट्याचे व फसवाफसवीचे गुलाबी कांटे, श्रीसाईच्या कृपाप्रसादाखालीं एकत्र येऊन झुगारून देऊं या, आणि प्रेममय, आल्हादकारक गुलाबाचें गुलाबी फूल मिळवून व तें गुलकंदाप्रमाणें सांठवून ठेवून त्याच्या गोड रसानें चुरचूर बोलणाऱ्या जिभेला न्हाऊं घालूं आणि रसाळ, गोड व मधुर-मधुर बोलावयाला शिकवूं.

जगांत दुजाभाव असणें म्हणजे दुःख असणें व समभाव असणें म्हणजे सुख असणें तरी आपण अद्वैताची कांस धरूं या. अद्वैत म्हणजे माझ्यासारखा दुसरा आहे अशी भावना आणि ही भावना भगवंताच्या श्रीसाईच्या अखंड सहवासानेंच दृढ होईल.

श्री साईनाथांची लीला-'साईलीला'-या मासिकांत प्रसिद्ध होत आहेत. त्या मासिकाचा पहिला अंक साईभक्तांच्या हातीं गेला आहे. साईभक्तांनों! आपल्या विचारांची विचारसरणी, गोड अनुभवांची मिळवणी व संतांची करणी आपापल्या बुद्धीच्या लेखणींतून लिहून साईलीलेंत प्रसिद्ध करण्याकरतां शक्य तों लवकर पाठवून द्या. अशा रीतीनें आपण सर्वांनीं साईलीला मासिकाला अलंकृत केलेत तर आपणां सर्वांना संतांचा अगर श्रीसाईचा चिरकाल सहवास लाभेल. सर्वांना सोईस्कर पडावें म्हणून साईलीलेची वर्गणी फक्त रु. २-४-० वार्षिक ठेविली आहे.

ज्ञान हें रामफळासारखें आहे व भक्ति ही सीताफळासारखी आहे. आपण सर्वांनीं भोळीभावडी भक्तीच करूं व भक्तिभावप्रेमाचा रस पिऊन-जीवाची जाणीव-अज्ञानाची राख धुऊन-उपजत ज्ञानाच्या जागत्या जोतीच्या प्रकाशानें ह्या जुगारी जगांत, इकडे तिकडे; चोहिंकडे आनंदाचा लखलखाट पसरूं व विषारी कांट्यांना हुडकून काढूं.

भक्तानों! कचरूं नका, माघार घेऊं नका, पुण्याचा पैका पदरीं बांधा, आणि परमेश्वर-श्रीसाई-कसा आहे तो तुम्हीं स्वतःच्या डोळ्यांनीं स्वतःच पहा.

संपादक.

---

## 'साधकाची दिनचर्या'

(१) प्रातःकाळीं पहांटे ५ वाजतां जागें झाल्याबरोबर गुरूचें ध्यान करावें.

(२) महावाक्याचा उच्चार करून त्याच्या अर्थाचा बोध होईल अशा तऱ्हेनें विचार करणें.

(३) नाम-मंत्राचें स्मरण करणें.

(४) आराध्य दैवताचें चिंतन करणें.

(५) मग मंगलाचरण करून भजन स्तवन भूपाळ्या म्हणाव्या.

(६) देवाच्या सगुण स्वरुपाचें अंगप्रत्यंगासह ध्यानपूर्वक वर्णन करून भजन करावें.

(७) देव, भक्त, संत, तीर्थ यांच्या भूपाळ्या म्हणाव्या.

(८) नंतर काकड आरती करावी.

(९) नंतर स्नानसंध्यादि नित्यकर्मविधान करावें.

(१०) मग एकांतीं निवांतस्थळीं किंवा मुखावरून वस्त्र घेऊन आराध्य मूर्तीचें स्तवन करून व आपली गुरुपरंपरा आठवून एकाग्रमनानें नामस्मरण करीत करीत जप करावा. मन एकाग्र असावें, जपाची माळ १०८ मण्यांची, तुळस, रुद्राक्ष, चंदन, पोवळीं

स्फटिक, कमल बी, अशोक वृक्षाची बी, यांपैकीं मिळेल त्या तऱ्हेची घ्यावी. आपला रोजचा नियमित जप न चुकतां नियमितपणें करावा. वेळ न मिळाल्यास एकतरी माळ ओढावी; नंतर निवांतपणें नित्यनेमाची भरती करावी. नामस्मरण फक्त जपाचेंच वेळीं करावयाचें असें नसून अखंड स्मरण ठेवावें. अशा रीतीनें जिव्हेस नामस्मरणाची संवय लावावी.

( ११ ) नंतर यथासांग देवार्चन पूजन वगैरे करावें.

( १२ ) मग देवांस नैवेद्य वगैरे दाखवून नमस्कार घालावे. सूर्यदेवास नमस्काराची फार आवड आहे. म्हणून सूर्यनमस्कार ( साष्टांग ) अवश्य घालावेत नंतर इतर देवांस क्रमानें नमस्कारावें.

( १३ ) नंतर स्तोत्रादि पाठ करून तीर्थसेवन करावें

**॥ तीर्थसेवनाचा मंत्र ॥**

**अज्ञान मूलहरणं जन्मकर्म निवारणम् ।**
**ज्ञानवैराग्य सिद्ध्यर्थं गुरु पादोदकं पिबेत् ॥ १ ॥**

प्रत्यक्ष गुरूचें तीर्थ न मिळाल्यास गंधयुक्त श्रीचरण निर्माल्य ताईतांत ठेवून त्याचें पूजन करून तें तीर्थ नेहमीं घेण्यास साईस्कर पडेल. तीर्थ घेतांना महावाक्याचा त्रिवार अर्थयुक्त उच्चार करावा. ( तत्वमसि, सोहं हंसा, अहं ब्रह्मास्मि )

( १४ ) मग कांहीं वेळानें भोजन किंवा फराळ करावा. प्रोक्षिलेलें अन्नतरी पानामध्यें टाकूं नये. केव्हांही कोणताही पदार्थ सेवन करण्यापूर्वी गुरुदेवास अर्पण करून नंतर सेवावा. दुपारीं १२ वाजतां अगर आपण जेवणाच्या वेळीं वैश्वदेव करावा व नंतर आराध्य दैवतास त्याचा नैवेद्य दाखवून मग तो प्रसाद आपण ग्रहण करावा.

( १५ ) त्यानंतर देवाचें स्मरण ठेवून आपला जो व्यवसाय असेल तो पहावा. ( व्यवसाय = रोजगार–उपजिविकेचें साधन ) आपण आपल्या प्रपंचाबरोबर इतरांकडेही पहावें. दुःखितांचें दुःख पाहून कष्टी व्हावें, शक्त्यनुसार त्यांच्या दुःखाचा परिहार करावा. कोणी क्षुधित असल्यास त्यास यथाशक्ति अन्नदान देऊन प्रेमळ वचनांनीं संतोषवावा. कोणाचेंही मन दुखवूं नये. अवघे सुखी असावे ही वासना ठेवावी. कोणतेंही काम करतांना श्रीनामाचा विसर न पडावा.

( १६ ) सायंकाळीं सायंसंध्यादि कर्मे करून देवांचीं दर्शनें घ्यावीं, स्तोत्रें म्हणावीं, प्रदक्षिणा कराव्या व स्तवनें म्हणावीं.

( १७ ) नंतर फराळ भोजन वगैरें करावें.

( १८ ) नंतर प्रपंच पाहून पुन्हां परमार्थास लागावें. पंचपदी करावी.

**–पंचपदीमध्यें येणाऱ्या गोष्टी–**

( १ ) मंगलाचरणीं नाम–भजन करावें, स्तवनाचे श्लोक म्हणावे, गुरुपरंपरा आठवावी.

( २ ) नंतर प्रेमानें भजन करावें.

(३) नंतर अर्थ ध्यानीं आणून ग्रंथवाचन करावें (श्रवण, मनन व निदिध्यास ठेवावा.)

(४) नंतर सगुण निर्गुणावर पदें म्हणून धांवे वगैरे म्हणावे.

(५) नंतर भजनघोष करून शेजारत्या म्हणाव्यात.

(१९) नंतर सकाळपासून संध्याकाळपर्यंत केलेल्या कर्मांचा पाढा वाचून देवाला अर्पण करणें व देवाकडे आपलीं कर्में देवास निर्दोष करून घे असें मागणें मागून शरण जाणें.

(२०) नंतर निजतेवेळीं नासाग्री दृष्टि ठेवून नामस्मरण करीत स्वस्थ निद्रा करावी.

अशा रीतीनें साधकानें आपला कार्यक्रम आचरण्याचा प्रयत्न करावा, म्हणजे दिने दिने साधकास या मार्गाची गोडी लागेल व भगवंताची कृपा होऊन प्रपंच व परमार्थ आपल्या हातून साधून जन्माला आल्याचें सार्थक होईल.

डॉ. के. बी. गव्हाणकर

---

# बंदीवास

आधुनिक संतचूडामणि श्री सद्गुरु साईबाबा यांच्या आगमनानें व चिरकाल सहवासानें शिरडी गांवाचें 'शिरडी क्षेत्र' झालें. त्यांच्या आईबापांचा व नातलगांचा पत्ता अद्यापपर्यंत कोणालाही लागला नाहीं. व्यंकूसहा हे आपले गुरु आहेत असें ते म्हणत.

नदीचें मूळ व गुरूचें कूळ पाहूं नये असें म्हणतात. संत काय खातात, काय करतात हें जाणून घेण्यापेक्षां ते स्वतः लोककल्याणाकरतां कसे झटतात तें पाहून त्याप्रमाणें आपण वागण्याचा प्रयत्न करून बंदीवासांतून सुटून जाणें हें आपलें कर्तव्य आहे.

**वस्तुतः ईश्वरचि आह्मी आपण ।**
**परी परमार्थस्वरुपविस्मरण ॥**
**हेंच मुख्य भेदाचें लक्षण ।**
**अधःपतन तें हेंच ॥**

(दाभोळकरकृत साईचरित्र)

प्रत्येक मानवप्राणि हा जन्मतःच स्वतंत्र असतो, परंतु स्वतःच्या कर्मानें तो स्वतःला विसरून बंदीवास प्राप्त करून घेतो. मोक्ष म्हणजे काय ?– मुक्त होणें, म्हणजे बांधलेलें नसणें, ना वासनांचा गुलाम, ना सत्तेचा गुलाम. अशा रीतीनें समाधानवृत्ती ठेवून

सत्कर्म करीत राहून आनंद मिळविणें म्हणजेच मोक्ष, आणि तो मिळविणें म्हणजेच 'मी' पणाला झुगारून देणें होय.

या जगांत आपली म्हणण्याजोगी अशी एकतरी वस्तू आहे का? स्वतःचें शरीर-सुद्धां आपलें नाहीं. तें पंचमहाभूतांचें आहे.

**देह तो आहे उसनवारी। पंचभूतांची सावकारी।**
**निजस्वार्थ साधलियावरि। परतणें माघारीं ज्याचा त्या ॥**

मग माझें आहे तरी काय? कांहीं नाहीं. आपण स्वतःला ओळखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. चर्मचक्षूंनीं जें पाहतों तें नश्वर आहे. मृगजळ आहे. आणि आम्हीं मानव हरिणीप्रमाणें त्याच्या मागें लागतों आणि बंदीवासांत पडतों.

चौऱ्याऐशीं योनि भ्रमण करून हा नरदेह आपणांस प्राप्त झाला आहे. पशू आणि नरदेह या दोहोंमध्यें फरक फक्त–बुद्धी आणि वाचा– आपण त्याचा जर दुरुपयोग केला तर त्या सर्वसाक्षी परमेश्वरास काय वाटेल?

एखादा सारथी गाडी हांकतो पण तो जर आपल्या ध्यानावर असेल तर गाडी नीट हांकेल, पण तो जर एखाद्या निशेंत असेल तर हातांतील लगाम सैल सुटेल आणि घोडे सैरावैरा धांवून आडरस्त्यानें गाडी जाऊन खड्डयांत पडेल. तसाच हा नरदेहसुद्धां एक रथ आहे. त्याला दहा घोडे आहेत, बुद्धि हा त्याचा सारथी आणि मन हा लगाम. पण जर बुद्धिरुपी सारथ्यानें मनरुपी लगाम आपल्या हातांत बरोबर ठेवला नाहीं तर ह्या देहरुपि रथाची व आंत बसलेल्या आत्म्याची काय स्थिति होईल?

मन हें संकल्प–विकल्पाचें उगमस्थान आहे आणि म्हणून प्रत्येक मानवानें या मनाच्या आहारीं न जातां आपल्या बुद्धीच्या प्रभावानें आणि सामर्थ्यानें मनाला ताब्यांत ठेवून सत्य, असत्य जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

श्रीसाई हे हिंदू का मुसलमान हा वाद घालत बसण्यापेक्षां त्यांच्या चरित्राकडे व उपदेशाकडे नजर ठेवून त्याप्रमाणें आपण वागूं लागलों तर आपणाला ते कोण होते याचा पत्ता लागेल. प्रत्येक मानवानें सत्कर्म (स्वतःचा रोजगार) करीत राहिलें पाहिजे, व तें कर्म आपलें सर्वस्व प्रेम देऊन, खरी भक्ती कसाला लावून मान, आपमान, जातगोत, गरीबश्रीमंत हा भेद न मानतां ईश्वरावर पूर्ण श्रद्धा ठेवून जर तो करील तर ईश्वर कसा आहे व कोठें आहे तें त्यास समजून येईल. त्याकरतां जंगल अगर एकांत-वास नको. खरी मुक्ती ती हीच.

संत त्यांची ती ती सेवाकर्मे करून मुक्त झाले. कबीर वस्त्रें विणी. त्याचा त्याला कंटळा आला नव्हता. त्या कर्मांत तो ईश्वराला पाही. गोरा कुंभार मडकीं घडवी. माती तुडवितां तुडवितां तो स्वतःला विसरे. स्वतःचें मूल त्याच्या पायांखालीं गेलें तरी त्याला भान नव्हतें. स्वतःच्या कर्मांत तो अवीट, अखूट व अतूट आनंद मिळवीत असे.

कर्म लहान वा मोठें हा प्रश्न नव्हे तर तें करतांना तुम्हीं स्वतःला किती विसरतां, त्या कर्मांत किती गढून जातां हें आहे.

श्री साईबाबांची तसविर लावून, तिला रोज गंधपुष्प वगैरे लावून, तिची नुसती पूजा केलीत परंतु स्वतःचा रोजगार केला नाहीं, तर श्रीला त्या पूजेचा वीट येईल. ते म्हणतील, अरे मला त्या गंधपुष्पांचा भार सहन होत नाहीं. त्याखालीं मी दडपला जात आहे. हें प्रेम नव्हे तर हा दंभ आहे.

या जनासी वेड लागलें
शिळा तांब्याचे बाहुलें केलें
पाट मांडोनीं वरी बैसविलें
वस्त्र अंलकारानीं गुंडाळिलें
मना आले तें नांव ठेविलें
शुद्ध पाण्यानी प्रक्षाळिलें
गंध फुलांनीं झांकोळिले
धूप दावोनी दीप उजळीले
पुढें अन्न ठेवूनी चालविलें
घेरी घेवोनी भोवंडीलें
आडवें पडोनी दंडवत केलें
आपपर नाहीं देखीले
एका जनार्दनी ओळखीलें

नुसती पूजा अर्चा न करतां, आपलें कर्म करीत राहून, त्यांत श्रीसाईला पहा म्हणजे तें कर्मसुद्धां चोख होईल, व श्रीसाई तुम्हांला मिळेल. स्वतः श्रीसाईबाबांनीं भिक्षा मागून आपला चरितार्थ चालविला. मी स्वतः प्रत्यक्ष पाहिलें आहे, कीं त्यांच्याकडे दररोज चांदीच्या ताटांतून पांचपन्नास सुग्रास नैवेद्य येत, परंतु बाबा त्या सर्वांना नुसता हात लावीत अगर थोडासा घांस घेत, आणि स्वतः आणलेली भिक्षेची भाकरी ते कोळंब्यांतून खात. पण आम्हीं त्यांचे भक्त काय करतों !

एका लहानशा कर्मानेंसुद्धां मोक्ष-मुक्ती मिळेल, पण अर्थात् त्यांत जिव्हाळा, प्रेम, आपला आत्मा असेल तर, आपण ब्राह्मणांस दक्षिणा देतों, त्यावेळेस ती पाण्यांत भिजवून ओली करून देतों. त्याचा अर्थ काय तर दक्षिणा, मग ती एक रुपया असो अगर एक पैसा असो, हृदयांतील प्रेमाचा ओलावा त्या दक्षिणेंत आहे. रुक्मिणीचे एक भाव-भक्तीचें तुळशीपत्र सत्यभामेच्या सोन्याचांदीच्या, हिरेमाणकांच्या दागिन्यांच्या राशीहून वजनदार ठरलें तें याचमुळें. आपलें कर्म भक्तीमय-प्रेममय करा. कबीरानें म्हटलें आहे.

कबीर कबीर क्या किया जा जमूनाके तीर ।
एक गोपीके हृदयमें बैठे गये लाखों कबीर ॥

गोपींची सेवा प्रेममय होती. त्यांनीं आपल्या सर्वस्वाचा होम करून श्रीकृष्णाला आपलासा करून घेतला.

आई मुलाची सेवा करते, त्याच्यासाठीं झटतांना ती स्वतःला विसरून जाते.

मोक्ष जपतपांत नसून धर्मात आहे. कर्मात आहे. जप म्हणजे निदीध्यास, तळमळ, कर्म, निःस्वार्थी होण्याची तळमळ होय. आणि तीं सर्व कर्में रात्रौ झोपतेवेळीं ईश्वराला अर्पण करून त्यांचा नैवेद्य त्याला दाखवावा आणि म्हणावें कीं, देवा अजून हीं कर्में निर्दोष नाहींत. तीं निर्दोष करून घे. आणि या लेकरावर कृपा कर. मन लावून जिव्हाळ्यानें, प्रेमानें कर्म करा. खरा धर्म तो हाच आहे.

संत जनाबाई जात्यावर दळतांना दमत नसे. ती कधीं धर्माकर्मासंबंधीं वाद-विवाद करण्यास अगर चकाट्या पिटण्यास जात नसे. ती म्हणे, "माझ्या घरीं देव आले आहेत त्यांना चांगली भाकर पाहिजे. मला दाणे निवडून पीठ बारीक दळूं दे." अशा भावनेनें ती दळत असे. तिचे हात दमत नसत. जणूं काय ते देवाचे हात होऊन जात. भक्तिमय कर्मात असा आनंद आहे.

"**शांताकारं भुजगशयनं**"। परमेश्वर सहस्त्र फणांच्या शेषावर झोंपला आहे याचा अर्थ काय? तो कर्में करीत आहे. तो मेघराजाला पाठवितो, तारे हंसवितो, शेत पिकवितो व आपणांकरतां रात्रंदिवस कष्ट करीत असतो.आणि तरी सुद्धां आम्हीं मानवप्राणी ईश्वराला शिव्या देतोंच देतों.

**पोटापुरतें काम । आणि अगत्य तो राम !**

मुखानें नाम व हातानें काम चालूं द्या. तुम्हांला त्या कर्मात समाधान होईल व खरा आनंद, खरा ईश्वर–खरा श्रीसाई तुमचा होईल. एकाग्रता होईल, आणि डोळे प्रेमाश्रूंनीं भरून येतील. अष्टभाव दाटतील, अंगावर रोमांच उभे राहतील. "ईश्वराचें नांव उच्चारतांच जोंपर्यंत तुझे डोळे भरून येत नाहींत तोंपर्यंत कर्म सोडूं नकोस आणि हीच शेवटची स्थिति कीं तुम्हीं स्वतः मुक्त अहांत बांधलेले नाहीं."

श्रीसाई स्वतःच्या तपश्चर्येनें मुक्त झाले, परब्रह्मस्वरूप झाले आणि ते सर्वांना हेंच सांगत आहेत कीं, प्रेम संपादन करा, कर्म करा, आळस काढून टाका, कोणाशीं भांडूं नका व उणें बोलूं नका आणि आपला हट्टपणा सोडून मला शरण या, माझ्या चरणीं विनम्र व्हा व स्वतःला ओळखण्याचा प्रयत्न करा.

संत सांवता माळी यानें प्रत्यक्ष विठोबा कुठें आहे तें दाखविलें. त्याप्रमाणें शेतांत चांगलें पीक येण्यासाठीं त्याची मशागत करावी लागते, तें भाजावें लागतें, नांगरावें लागतें, त्याप्रमाणें देहरूपी शेत, हें नामरुपी शब्दानें भाजावें, व नांगरावें, त्यामुळें त्याला शुद्धता प्राप्त होते आणि मग अहंकारानें चढलेलें अज्ञानाचें पटल दूर होऊन उपजत असलेलें ज्ञान प्रकट होतें. आणि हें ज्ञान प्राप्त होणें, म्हणजेच स्वतःचें मरण

स्वतः पाहणें. त्यालाच न जननं न मरणं अशी स्थिति प्राप्त होणें,–बंदीवासांतून मुक्त होणें म्हणतात. म्हणूनच प्रत्येक मनुष्यप्राण्याला या बंधनांतून मुक्त होण्यास, मोहमाया पसारा दूर करून, परमात्म्याच्या ज्योतीला आपली आत्मज्योत मिळविण्याकरतांच हा नरदेह सर्वसाक्षी परमेश्वरानें दिला आहे.

सारांश :–**गुरुकृपा उजीयेडें । फिटे भवभयाचे सांकडे ।**
**निश्रेयसमार्गद्वार उघडें । असूख रोकडें सुख होय ॥**
**नित्य स्मरतां सद्‌गुरुचरण । विरे विघ्नांचें विघ्नपण ।**
**मरणासिहि येईल मरण । घडे विस्मरण भवदुःख ॥**

**डॉ. के. बि. गव्हाणकर**

---

# ‘ साई–प्रभाव ’

संपादक महाशय श्री साईलीला यांसः—

श्री सद्‌गुरु साईबाबांना मी कधीं पाहिलें नव्हतें पण माझे वडील साईभक्त असल्यामुळें त्यांच्यासंबंधीं बऱ्याच गोष्टी ऐकल्या होत्या. माझा ताजा अनुभव देत आहें.

मी माझ्या वडिलांबरोबर माझी मातोश्री व बंधुभगिनीं मिळून एकंदर १० मंडळी गोव्याला–पेडणें येथें आमच्या मामेभावाच्या लग्नाला गेलों होतों. एकंदर ६० मंडळींचें वऱ्हाड गुरुवारीं गेलें. त्यांच्याबरोबर फक्त माझा धाकटा भाऊ दिनकर झाला वडिलांनीं पाठविला कारण श्रीसाईची आम्हांला जाण्याची मनाई होती. शनिवारीं सकाळीं वडील देवपूजेवरून उठले व म्हणाले, ‘उद्यां आपण सर्वांनीं गोव्यास जाऊं या. बाबांनीं कौल दिला.’ मी त्याप्रमाणें बाबांस चिठ्या टाकल्या तों त्यांतही बाबांनीं आम्हाला सम्मति दिली. लगेच वडिलांनीं माझ्या मामाला भाऊच्या धक्क्यावर तिकिटें काढण्यास सांगितलें, परंतु बोटीचीं सर्व तिकिटें संपल्यामुळें त्यांना कुठल्याच क्लासचीं तिकिटें मिळालीं नाहींत, त्यामुळें आमचीं तोंडें तर अगदीं फोटो (!) घेण्यालायक झालीं होतीं. वडील रात्रीं ९ वाजतां आले तेव्हां आम्हीं झालेली हकीगत सांगितली. ते म्हणाले ‘ उद्यां ७–३० ला निघायचें. ‘समर्थ साई सर्व करतील.’ त्याप्रमाणें आम्हीं सर्वजण, भाऊच्या धक्क्यावर ९ वाजतां आलों. बोट अद्याप गोव्याहून आली नव्हती. झिरो नंबरच्या शेडमध्यें आमची रीतसर तपासणी कस्टमकडून झाली व आम्हीं सर्व धक्क्यावर बोटीची वाट पहात उभे राहिलों. इतक्यांत एक तिकीट कलेक्टर वडिलांना भेटला आणि म्हणाला तुम्हीं बोटींत जागा मिळवा गर्दी फार आहे. मी तिकिटें काढून देतों. बोट ११ वाजतां धक्याला लागली व आम्हीं कसेबसे बोटींत अप्पर क्लासमध्यें शिरलों. जागा मिळाली व बोट लागत असल्यामुळें सर्व पडून राहिलों. बोटीनें

दुपारीं ३ वाजतां भाऊचा धक्का सोडला व गोव्याच्या मार्गाला लागली. बोटींतील पॅसेंजर सांगूं लागले कीं, ' बोट गोव्याला उद्यां दुपारीं ४-वाजतां जाईल व तुम्हीं पेडण्याला रात्रौ १० वाजतां पोंचाल,' माझी व माझ्या आईची कंबर खचली. कारण दुसरे दिवशीं ७ वाजतां लग्न होतें व आम्हीं दहा वाजतां जाणार (?) अखेर दुसरे दिवशीं सकाळीं दहा वाजतां बोट गोव्याच्या धक्क्याला लागली. तेथें डॉक्टरची तपासणी होऊन आम्हीं सर्व ११ वाजतां गोव्याच्या **पणजीम** बंदरधक्क्यावर उतरलों. तेथें परप्रांतांत आमची रीतसर तपासणी झाली परंतु वडिलांनीं डिक्लरेशन फॉर्म भरावा लागतो तो भरला नसतांनासुद्धां अवघ्या १० मिनिटांत आम्हीं त्या कस्टम शिपायांच्या तडाक्यांतून सुटून वेळेवर सर्व साधून २-३० वाजतां पेडणे मुक्कामीं पोहोंचलों. पणजीम बंदरांत T. C. नें आमच्या हातीं तिकिटें दिलीं व त्याचा हंदील वडिलांनीं आल्यानंतर ज्या T. C. नें तीं तिकिटें काढलीं होतीं त्याला दिला. त्याला वडिलांनीं विचारलें कीं तूं माझ्याकरतां पैसे भरलेस ! नंतर त्यानें सांगितलें कीं तुम्हीं गर्दीत दिसला नाहींत फक्त बोटींत बसल्यावर तुम्हाला पाहिलें म्हणून तुमचीं तिकिटें T. C. कडे देऊन ठेवलीं व त्याला तुम्हांला दाखवून ठेविलें. तुमचे पैसे काय कुठें जातात. तुम्हीं साईभक्त आहांत तसेंच ज्या गृहस्थाकडे आम्हीं गेलों होतों ते एक तेथील बडे श्रीमंत मनुष्य आहेत त्यांना Vicount of pedne असें म्हणतात. श्रीमंतीचें वैभव पाहिलें व येतांना आम्ही लग्नवऱ्हाडाबरोबरच आल्यामुळें आम्ही ८० पॅसेंजर होतों. त्यांनीं आमची पैसे वगैरे भरून सर्व व्यवस्था केलेली होती व काकाजी-त्यांना काकाजी म्हणतात - माझ्या वडिलांना म्हणाले कीं जागा रिझर्व आहे तुम्ही स्वस्थ बसा. आम्ही बोटींत-रत्नागर-पॅसेंजर कसे चढतात व जागा धरतात तें पहात होतों ! कारण आमची जागा रिझर्व आहे. इतक्यांत काकाजींना त्यांच्या इसमानें सांगितलें कीं, रिझर्व केलेली जागा गेली. आतां काय करूं या. बोटींत जागा नाहीं. एजंटानें माझ्या वडिलांना सांगितलें कीं, आतां तुम्ही पेडणे मुक्कामीं जा व परत शनिवारीं बोट आहे त्या बोटीनें तुम्ही जा. कारण बोट भरून गेली. वडिलांनीं सांगितलें मी बोटींत जाऊन पाहून येतों. वडील बोटींत गेले व T. C. ला भेटले. त्यांनीं श्रीसाईच्या कृपेनें फाळका-बोटीचा एक भाग-त्यांत आमची सर्वांची व्यवस्था केली व आम्ही त्याच बोटीनें ८० पॅसेंजरसह कोणत्याही प्रकारें त्रास न होतां मुंबईस आलों व घरीं ११ वाजतां खरोखरच श्रीसाई-कृपेनें आम्ही हा प्रवास पूर्ण केला.

वडील म्हणाले, माझा "**श्रीसाई**" **राजांचा राजा** आहे. आपण सर्वजण त्याला शरण जाऊं या.

**प्रमोद गव्हाणकर**

श्री सद्गुरु साईबाबा यांच्याविषयींच्या अनेक गोष्टी माझे मित्र रा. रा. तुकाराम पवार यांनीं मला सांगितल्या होत्या. त्यांच्या एका पुण्यतिथीच्या दिवशीं मी माझी मंडळी व तुकाराम पवार, डॉ. गव्हाणकर यांच्या घरीं कुर्ल्यास गेलों होतों. तेथील तो उत्सवसोहळा पाहून आम्हीं उभयतां श्रीसाईच्या सेवेला लागलों. मोठमोठ्या

डॉक्टरांनीं माझ्या बायकोला ऑपरेशन झाल्याशिवाय मूल होणार नाहीं असें सांगितल होतें परंतु आमची सेवा बाबांनीं मान्य केली व सेवेला लागल्यापासून ४ वर्षांनीं आम्हांला पुत्र झाला.

श्रीसाईच्या पश्चात जर त्यांचाएवढा अनुभव मिळाला तर ज्यांनीं त्यांना प्रत्यक्ष पाहिलें असेल ते खरोखरीच पुण्यवान असले पाहिजेत.

**नारायण आंग्रे**
**ठाणा.**

श्री सद्‌गुरु साईबाबांस मी स्वतः पाहिलें नाहीं परंतु त्यांचा प्रभाव माझ्या कानीं आला होता. एकदा मी डॉ. गव्हाणकर यांचेबरोबर शिरडी मुक्कामी गेलों व समाधीचें दर्शन घेऊन आलों.

माझी महिन्याची प्राती फार थोडी असल्यानें, सौभाग्यवतीचा प्रसूतीकाल, जसजसा जवळ येत चालला, तसतशी माझी चिंता वाढत चालली. परंतु या प्रसंगांतून श्री साई आपणांस पार नेतील असें म्हणून मी त्यांच्यावर विश्वासून राहिलों. गोकुळ अष्टमीच्या दिवशीं, सकाळींच ध्यानीं मनीं नसतां सौभाग्यती मोरींतच प्रसूत झाली. व बाजूला एक म्हातारी आली होती, तिनें बाळंतिणीची सर्व व्यवस्था केली. तिसरे दिवशीं मीं कामावर ( G. I. P. Workshop, Matunga ) गेलों, तों साहेबांनीं आमचा महिन्याला, रु. ४ प्रमाणें पगार वाढीचा पगार रु. ६० दिला. अशा रीतीनें श्रीसाईनीं सुईणीची व पैशांची व्यवस्था केली व मी काळजींतून मुक्त झालों.

**झिलू बेहेरे**

शिरडीचे श्रीसाईबाबा, यांची माहिती मला श्री. नागेशराव सावंत यांचे-कडून झाली. मी त्यांना माझ्या कल्पनेप्रमाणें भजत असे. प्रत्यक्ष त्यांना मी पाहिलें नव्हतें. माझ्या तोंडावर व पायावर चिचवी ( Wet Eczima ) हा त्वचेचा रोग झाला होता. मी पुष्कळ औषधोपचार केले. त्वचेचे नामांकित डॉक्टर, यांचीं औषधें-इंजेक्शन्स वगैरे दोन महिनेपर्यंत केलें. तोंडावर सर्व चिचवी झाल्यामुळें मला जगांत तोंड दाखविणें लाजिरवाणें झालें. माझे मित्र रा. तुकाराम पवार यांनीं डॉ. गव्हाणकर यांच्या दवाखान्यांत मला नेलें. डॉ. गव्हाणकरांनीं मला "तूं शिरडीस जा, व श्री साईच्या तीर्थाची आंघोळ कर, व निंबवृक्षाला १०८ प्रदक्षिणा घाल. असें ७ दिवस-पर्यंत कर, व आठवे दिवशीं श्री सत्यसाईची पूजा घाल. साईबाबा तुला बरे करतील." असें सांगितलें. मी औषधें खाऊन, व मलमें लावून, कंटाळलों होतों. त्यामुळें मी दुसरे दिवशीं शिरडीला गेलों व डॉ. गव्हाणकर यांनीं सांगितल्याप्रमाणें प्रेमभावानें श्रीसाईला शरण जाऊन वागलों. आश्चर्य असें कीं मी आठवे दिवशीं साफ बरा झालों व आजमितीपर्यंत मला तो रोग झाला नाहीं. आज त्याला आठ वर्षें झालीं. अलिकडे मी डॉ. गव्हाणकर यांच्या सल्ल्यापमाणें श्रीसाईची सेवा करतों व श्रीसाईच्या कृपेनेंच अद्यापपर्यंत सुखाचे दिवस पहात आहें.

**बाबुराव इंगळे**

# " श्री साई–सुधारस माला "

(१)

पहिलें नमन माझें गणाधीशा ।
असे हृषिकेशा दूसेरे तें ।
तीसरें नमन सर्व संत जना ।
असो उरल्याना चवथे ते ।
भाकितो करुणा तुम्हां सर्व जणा ।
गावया कवना बुद्धी द्यावी ।
साईदास म्हणे देई मज स्फूर्ति ।
गावयास किर्ती तुझी देवा ।

(२)

पृथ्वीवृत्त.

अये मयुर वाहिनी मृदुकरें धरोनी वीणा ।
स्वयें त्वरित ये इथे करीत मी तुझी प्रार्थना ।
रसाळ गुरुच्या कथा ममकरें लिहाव्या जरी ।
सहाय्य नसतां तुझे कवण साहसा या करी ।

(३)

जयाचीये पोटीं होई हें जनन ।
तयासी नमन असो माझे ।
कटी खांदी ज्यांनीं मज नाचविले ।
कष्टही सोशिले अगणीत ।
त्यांचे उपकार किती आठवावे ।
तयासी स्मरावें हेच ऊरे ।
साईदास म्हणे मातापित्याविना ।
गोडी ना जीवना कदाकाळीं ।

(४)

तुझे मी पाहिलें जेव्हां मी चरण ।
हरपला शीण बाबा माझा ।

वाटला विसावा तोचि माझे जीवा ।
आतां चरणसेवा कोठली ती ।
योग नाहीं आला पुन्हां भेटण्याला ।
तुझ्या चरणाला नारायण ।
साईदास म्हणे खंत वाटे जीवा ।
आतां तो देखावा पुन्हा नये ।

(५)

येवोत संकटें पडोत ते कष्ट ।
माझे इष्टा निष्ट तुझे हातीं ।
सर्व भार आतां तुझे पायीं ।
ठेविली मी डोई पायी तुझ्या ।
कशाला वहावा चिंतेचा तो भार ।
दयेचा सागर असतांना ।
साईदास म्हणे आतां हे चरण ।
वाटो आमरण गोड आम्हां ।

(६)

कांहीं काळ होतो तुज विसरलो ।
आणि नागावलों सर्वस्वाला ।
तरी ही तुझी ती दयापूर्ण दृष्टि ।
करी पुष्पवृष्टी माझे वरी ।
भडकले होतें मन माझें भारी ।
येई ताब्यावरी तुझ्यामुळें ।
साईदास म्हणे तुम्ही दयावंत ।
संताचे ते संत कलियुगीं ।

(७)

किती आठवावे तुझे उपकार ।
जया अंतपार नसे कोठें ।
काळाचिये दाढे मधूनी दयाळा ।
तूंचिना ओढिला भक्त तुझा ।

संतती संपत्ती अशी जोड गोळी ।
मिळे कदाकाळीं थोडक्यांना ।
साईदास म्हणे तुझीया कृपेनें ।
नसे यास उणें कदाकाळीं ।

(८)

सदा मोहजाल उभें पुढें मागें ।
कोठवरी धागे सोडवावे ।
भाऊबंद यांना किती सांभाळावें ।
कोठवरी भ्यावें त्यांचे तोंडा ।
कोणीही कामाचे नसती हे लोक ।
नसे ज्या विवेक अल्प कांहीं
साईदास म्हणे नकोतही सोंगें ।
आवरी हें मुंगे साईनाथा ।

(९)

इखलास होता मनालागी त्रास ।
होय ते उदास सर्व काळ ।
रुचेना वाढले पुढ्यांतील अन्न ।
गमे ते कदान्न घांस घेतां ।
कोणीही बोलतां प्रेमाचें वचन ।
तयासी दूषण द्यावे वाटे ।
साईदास म्हणे मनाचा हा खेळ ।
भारी अचपळ आवरी त्या ।

(१०)

गांवोगांव झाले कितीएक बुवा ।
कोणजाणे कावा गुलामांचा ।
कांहीं मंत्रतंत्र धागेदोरे देणे ।
नसे कांहीं उणे त्यांचे घरीं ।
भविष्य सांगोनी जना भूलविती ।
नादी लाविताती अज्ञ जना ।

साईदास म्हणे माझे गुरुगृहीं ।
यांतील न कांहीं मिळायाचें ।

[ अपूर्ण ]

---

# श्रीसांई सुप्रसन्न.

## देव यांचें अल्प चरित्र.

( मागील अंकावरून पुढें चालू )

मागील अंकांत पान १६ वर जी वंशावळ छापण्यांत आली आहे त्यांत थोडी चूक झाली आहे; ती खरी खालीलप्रमाणें पाहिजेः—

**गोविंद**
|
**हरी**
|
**आबा**
|
**बाबुराव** ( फडणीस काका )
|
**सदाशिव** ( बाबा )
|
**विश्वनाथ** ( नाना )
|
**बाळकृष्ण**

साधारणपणें जी माहिती उपलब्ध आहे त्यावरून आमचें घराणें मूळ रत्नागिरी जिल्ह्यांतील कापदापोली या गांवचें; तेथून ती॥ आबा हे कल्याणला आले व तेथून पौढला जाऊन स्थायिक झाले. कल्याणला आमच्या घराण्याचें एक घर आहे असें म्हणतात. असो.

आमच्या वंदनीय पितृदेवांचे लहानपणाविषयींची व वरील वंशावळीची माहिती मला आमचे पूज्य चुलते ती॥ सदुकाका यांनीं दिली आहे. त्यांनीं पुष्कळच मेहनत घेऊन माझ्याकडें त्यांना जेवढी माहिती होती तेवढी लिहून पाठविली आहे. त्यांतली जितकी थोडक्यांत देतां येईल तितकी मी देणार आहें.

आमच्या वडिलांचें लहानपण पौड व आमच्या मोठ्या आईच्या माहेरपणी गेलें. त्यांचें लहानपण बालपणापासून आनंदी, सुबक, शांत असें गेलें. रडवे नाहींत, फार खेळकर नाहींत; राजऐश्वर्याचे खेळ, खोड्या हळूहळू कीं त्यापासून सर्वांना नवल वाटावें. प्रत्येकानें त्यांना उचलून घ्यावें, हिंडवावें, खाऊं द्यावा. हा मुलगा मोठा भाग्याचा होईल असें लहानपणापासूनच गांवांतील लोकांना वाटे; लहानपणापासून खेळसुद्धां 'मी मोठा मामलेदार' अशा तऱ्हेचे असत. उंच बसणेस जागा करावयाची व त्यावर आपण बसावयाचें, मुलें जमा करावयाचीं व त्यांना आपण आपल्या हाताखालीं ठेवावयाचें, कामें सांगावयाचीं, दंड शिक्षा, करावयाची, नेमणुका करावयाच्या, अशा तऱ्हेचा खेळ, खेळत असत.

एकदां पौडच्या शाळेंत असतांना त्यांनीं एका मुलाचा पायजमा पाहिला. तेव्हां त्या मुलाला घरीं आणलें व त्याचा पायजमा दाखवून तसा पायजमा पाहिजे असा हट्ट घेतला. ती॥ नाना म्हणाले बरें; व त्यांनीं पुण्याहून एक पायजमा आणला. व तो यांना दिला. तो पसंत पडला नाहीं; ती॥ नानांनीं सांगितलें कीं सध्यां तूं हा वापर मी पुन्हां पुण्याला गेलों म्हणजे दुसरा घेऊन येईन परंतु हें म्हणणें पटलें नाहीं. रुसले व तो पायजमा टाकून शाळेंत गेले. ती॥ नाना जितके प्रेमळ तसेच रागीटहि होते. मुलाचा हट्ट चांगला नाहीं. म्हणून आज शिक्षा होणार असें सर्वांना वाटलें. पण इतक्यांत ती॥ काका ( म्हणजेच आमचे पितृदेव ) शाळेंतून परत आले व तो पायजमा घालून परत शाळेंत गेले. अशा रीतीनें लहानपणापासून समजूतदारपणें वागण्याची पद्धत.

पूज्य ती॥ काकांच्या खोड्या श्रीकृष्णाप्रमानें हळू, क्लृतीबाज व मुकाट्यानें असत म्हणून यांना बाळकृष्ण म्हणूं लागले. व तेंच नांव पुढें कागदोपत्रीं चालू राहिलें. रामचंद्र हें नांव फडणीस काकांचें आहे. तसें म्हटलें तर पौडचे मूळ पुरुष बाबुराव फडणीस हे किल्ले कुवारीगड किंवा पुढें पौडखोर याचे फडणीस. यांनीं वंशपरंपरेनें फडणिशी मिळविली, ती पुढें पेशवाईनंतर इंग्रजी अमदानींत सोडून दिली म्हणजे बुडाली; कारण इंग्रजांनीं जेव्हां पेशवाईनंतर देवदेवस्थान, सरदार जहागिरदार, इनामदार, वतनदार, दरखदार यांची चौकशी केली तेव्हां हे दरखदार होते. ३५० रु. नेमणूक आमची होती; या सर्व नौकरदारांना आपआपले हुद्यावर बोलाविलें. तेव्हां ते लोक कामावर गेले. त्यापासून सरकारांनी जामीन मागितला. आम्हीं सरकारचे इमानी पिढीजाद नोकर, इमानी विश्वासू आहोंत सबब आम्हीं जामीन देत नाहीं असें त्यांना सांगण्यांत आलें; पण तें सरकारनें ऐकलें नाहीं म्हणून फडणिशी गेली. ती॥ नानांचें आयुष्य सर्व श्रीमंतींत, सुखांत, चैनींत, ऐषआरामांत गेलेलें. दुःख कष्ट त्यांना माहीत नाहींत. ती॥ बाबा फडणीस यांचा मोठा उग्र चेहेरा; ते फार सशक्त व मोठाड बांध्याचे होते. ती॥ नानांचे अंगावर हिऱ्या–मोत्यांचे, माणिक–पाचूचे असे दागदागिने असत.

शिक्षणाच्या बाबतींत लहानपणापासूनच ती॥ काकांची हुशारी दृग्गोचर होत होती. मराठी शिक्षण पौडच्या शाळेंत झालें. इंग्रजी शिक्षणाची सोय पौडला नव्हती. पुण्याला

आमच्या आत्याबाई ( मथूताई पंडित ) यांचें बिऱ्हाड होतें. तेव्हां त्यांच्याकडे आमच्या ती॥ काकांनीं रहावें असें ठरलें. पौडच्या शाळेंत मास्तरांची यांच्यावर फार प्रीति; वर्गांतील मुलें यांचेकडे घरीं शिकावयास यावयाची. मराठी ६ वीला जावयाचें. वय कमी, ठेंगणें आतां काय करावयाचें! असा मोठा विचार यांना व घरांतल्या मंडळींना पडला. इंग्रजी शिक्षणास नवीनच महत्त्व प्राप्त झालेलें. मराठी ५ इयत्ता झाल्यानंतर २-३ वर्षें फुकट गेलीं. असे त्यावेळचे लोक म्हणत असत. परंतु त्या अवधींत त्यांनीं अमरकोश, तिन्ही कांडें म्हणजे रूपावली, समासचक्र, वगैरे पाठ केले. रुद्र, ब्रह्मकर्म, गृहस्थास योग्य असे वेदाचे अध्ययनही केलें. ६ वी च्या परीक्षेला उंची नाहीं म्हणून उंच रुमाल डोकीस व उंच टाचाचा बूट घालून उंची वाढविण्याचा प्रयत्न केला. सर्व मुलें, मास्तर हंसूं लागले. सर्वांना काळजी वाटूं लागली परंतु गंमत अशी कीं, परीक्षकांनीं चेहेरा पाहातांच त्यास मोह उत्पन्न झाला व म्हणाले कीं बाळा, अजून तूं लहान आहेस. त्यांनीं २-४ प्रश्न विचारले; त्या प्रश्नांचीं उत्तरें अशीं देण्यांत आलीं कीं, त्या परीक्षकांना आश्चर्य वाटलें व अखेर परवानगी मिळाली.

( अपूर्ण )

---

# ॥ साधकास उपदेश ॥

प्रापंची ममता कधीं धरूं नको लोभांत गुंतूं नको।
लोकीं तूं खळ दुष्ट नष्ट भलत्या संगांत बैसूं नको।
कांहीं कर्म करूं नको गुरुमहा पंथासी मोडूं नको।
जो कोणी भवदुःख सर्व निरसी तो देव सोडूं नको॥ १॥

संसारीं असतां प्रवाह पतित द्वंद्वासि त्रासूं नको।
खेदाखेद मनांत आणुनि वनीं जाणें विचारूं नको।
कर्णीं दुष्ट कठोर शब्द पडती तें दुःख मानूं नको।
भोगें दुःख सुखादि सारुनि निजानंदास भंगूं नको॥ २॥

लाभीं हर्ष नको विषादहि नको निंदाप्रशंसा नको।
हानीचा मनीं शोक तो धरुं नको देहीं अहंता नको।
कोणाचें इतिकृत्य तू स्मरू नको माझें तुझें हें नको।

आप्तांसि ममता नको गुरुपरब्रह्मासि सोडूं नको ॥ ३ ॥

प्रारब्धीं सुखभोग योग नसतां तें दैन्य मानूं नको ।
इंद्राची बहु संपदा गणु नको क्षुद्रर्थ वांच्छू नको ।
देहाचें कृतकर्म दुःख अपुलें कोणास सांपूं नको ।
भूलोकांत महा प्रसंग पडतां तूं सत्य सोडूं नको ॥ ४ ॥

माया मोह नको सुसंग असतां सोडूनि जाऊं नको ।
चिंताशोक नको परार्थ करितां लोकांस लाजूं नको ।
वर्णोच्चार नको जनांत बसतां गोष्टी भवाच्या नको ।
चित्तीं राग नको अनावर खरें वैराग्य सोडूं नको ॥ ५ ॥

नानाचार नको कुकर्म करणें ही क्षुद्र बुद्धि नको ।
माया कल्पित वित्त बाजि करि हे भोगार्थ वांछूं नको ।
काया क्लेश नको जनीं मूढ अशा संगांत बैसूं नको ।
जेथें जाउनि येत ना मुनि कदा तें धाम सोडूं नको ॥ ६ ॥

---

# —:सद्गुरूचीं लक्षणें:—

(१) वेदांचें अध्ययन, सहाही शास्त्रांचें ज्ञान अगर वेदांतनिरुपण करणारे सद्गुरु नव्हेत.

(२) वायू कोंडणारे, जटा धारण करणारे अगर ब्रह्माच्या ज्ञानानें श्रोत्यांना रिझविणारे सद्गुरु नव्हेत.

(३) शिष्यांना शास्त्रोक्त मंत्र देणारे, जप करून घेणारे हे सद्गुरु नव्हेत.

(४) तत्त्वनिरुपण अगर शब्दज्ञान आपल्या रसाळ भाषेनें अघळपघळ बोलणारे सद्गुरु नव्हेत. जेथें स्वानुभवाचा दुष्काळ असून शाब्दिक पोकळ ज्ञान आहे ते सद्गुरु नव्हेत.

(१) जो संपूर्ण शब्दज्ञानी, पूर्ण अनुभवी असून ज्याला स्वानुभवाचें ज्ञान प्राप्त झालें आहे, तो सद्गुरु होय.

(२) ज्याला ऐकतेक्षणीं निरुपण करतां येतें व सर्व भोगांचा ज्याला वीट

आला आहे व अनुभवांची ज्याला गोडी लागली असून त्याप्रमाणें ज्याचें वर्तन आहे तोच सद्‌गुरु होय.

( ३ ) ज्याला अनुभव अवगत नाहीं तो शिष्याला अनुभव देऊन त्याचें समाधान कसें करणार ?

( ४ ) शिष्याकडून आपली स्वतःची सेवा करून घेण्याची कधीं स्वप्नींही इच्छा होत नाहीं उलट स्वतःचा देह शिष्याच्या फायद्याकरतां संकटांत घालतो तोच सद्‌गुरु.

( ५ ) शिष्य म्हणजे किंपदार्थ, गुरु काय तो श्रेष्ठांत श्रेष्ठ, असा ज्याच्याजवळ अहंभाव नाहीं तो सद्‌गुरु.

( ६ ) शिष्य तोही पूर्णब्रह्म, आणि त्याच्याठायीं पुत्रप्रेम, अशा रीतीनें जो वर्तन करतो तो सद्‌गुरु.

( ७ ) दया, क्षमा, शांतीचें जेथें आगर आहे; जेथें विद्वत्तेचा अभिमान नाहीं, जेथें लहानथोर, श्रीमंत–गरीब अशा तऱ्हेचा दुजाभाव नाहीं तोच सद्‌गुरु.

---

श्रीसाई लीलेच्या पहिल्या अंकांतील कु. तिलोत्तमा गव्हाणकर यांच्या 'भाव' या चुटक्याचें उत्तरः—

**प्रेमापाशीं नांदे भक्ति । तेथेंच अवघी शांती विरक्ति ।**
**तेथेंच पाठी तिष्ठे मुक्ति । निजसंपत्ति समवेत ॥**
**प्रेम नुपजे भावाविण । भाव तेथें देव जाण ।**
**भावापोटीं प्रेमपूर्ण । भावची कारण भवतरणा ॥**

अध्याय ४८ वा. साईसच्चरित.

---

**गोट्याः**—बंड्या तूं यमपुरी पाहिलीस का ?

**बंड्याः**—हो.

**गोट्याः**—कशी असते ?

**बंड्याः**—अरे ती, पाक–पुरी, बदामपुरी, खारिपुरी सारखी असते.

**तिलोत्तमा गव्हाणकर**

---

# श्रीसांई सुप्रसन्न

श्री. सन्मान्य संपादक 'श्रीसांईलीला' यांस सप्रेम प्रणाम. वि. वि. खालील तीन दुःखद निधनवार्ता आपल्या त्रैमासिकाच्या येत्या अंकांत प्रसिद्ध कराव्यात अशी विनंती आहेः—

## (१) कै. श्रीमती जानकीबाई बालकृष्ण देव

ह्या आमच्या परमपूज्य व प्रेमळ मातुःश्री ठाणें येथें आमचे बिऱ्हाडीं मंगळवार दि. २० एप्रिल १९४८ रोजीं सायंकाळीं ७ चे सुमारास एकादशीचे शुभदिवशीं श्री-सांईचरणीं विलीन झाल्या हें कळविण्यास अत्यंत दुःख होत आहे. श्रीसांईबाबा त्यांना आपल्या दिव्य चरणीं अढळ असें स्थान देतीलच! परंतु आम्ही मात्र मातृछायेला व मायेला कायमचे अंतरलों! आमचे परमपूज्य पितृदेव कै. ती. बालकृष्ण विश्वनाथ देव (ज्यांचे लेख श्रीसांईलीलेंत 'बाबांचे बाळ' ह्या सहीनें आलेले आहेत. सर्व श्रीसांई भक्तांच्या परिचयाचे आहेत व ज्यांचें चरित्र थोडक्यांत हल्लीं श्रीसांईलीलेंत प्रसिद्ध होत आहे) आम्हां सर्वांना दुःखसागरांत लोटून दि. १-१-४६ रोजीं श्रीसांईचरणीं विलीन झाले! त्यांच्या पश्चात आम्हांला मातृछत्राचा तरी लाभ होत होता तोही आमच्या दुर्दैवानें फारच थोड्या दिवसांत हिरावला गेला!

आमच्या पूज्य मातेचा विवाह तिच्या दहाव्या वर्षी झाला व श्रीसांईकृपनें सुखी विवाहित आयुष्याचा लाभ ह्या जोडप्याला ६० साठ वर्षे झाला. आम्ही दोघे जुळे भाऊ (एक राजूर, ता. आकोला. जि. अहमदनगर येथें सरकारी डॉक्टर आहेत) व एक वडील भगिनी (तीही डॉक्टर आहे.) इतकीच आम्ही भावंडें हयात आहोंत.

आमच्या पूजनीय कै.ती॥ पितृदेवांच्या हातून श्रीबाबांच्या कृपेनें जी लोकसेवेची, कुटुंबसेवेची, आप्तेष्टसेवेची व वडिलजनांच्या गुरुसेवेची व तसेंच बाबांच्या सेवेची जी काय थोडीफार कार्यें निष्कामबुद्धीनें झालीं, त्याचें सर्व श्रेय ते आमच्या पूज्य मातेच्या बहुमोल मदतीस देत असत.

एकदां शिर्डीस असतांना लेंडीबागेच्या विहिरींत पाय घसरून आमच्या पूज्य मातुःश्री पडल्या होत्या त्यावेळेला त्या एकट्याच होत्या. व त्यांची हांक जर दूर असलेल्या नोकरानें ऐकून तो धांवून आला नसता तर प्रसंग मोठा कठीण होता. पण बाबांच्या कृपेनें तो अपमृत्यूचा प्रसंग टळला.

मला सार्वजनिक सुरक्षा कायद्याखालीं दि. ५-२-४८ ला ठाणें येथें अटक करण्यांत आली व १। महिना मला ठाण्याच्या कारागृहांत स्थानबद्ध करण्यांत आलें. ह्या गोष्टीनें माझ्या पूज्य मातेच्या मनाला धक्का बसला व जरी मी सुटून आलों तरी तिच्या अंगांतील अशक्तता कमी होईना! त्यांच्या अंत्यसमयीं, आम्हीं सर्व भावंडें, आमचे

मावसबंधू डॉ. भाऊसाहेब ढवळे वगैरे मंडळी हजर होती. संस्थानचे अत्यंत मेहेनती, कष्टाळू, साईभक्तश्रेष्ठ मॅनेजिंग विश्वस्त श्री. वसंतराव गोरक्षकर हेही :अनायासें योगायोगानें हजर होते! असो! श्रीसाई पूज्य मातेच्या पवित्र आत्म्याला सुखशांति देवोत!

---

## (२) कै. रघुवीर भास्कर ऊर्फ दादा पुरंदरे (मृत्यू दि. १२-४-४८)

हे सर्व सांईभक्तांच्या पूर्ण परिचयाचे आहेत. यांनीं शिर्डीचा कोठलाही उत्सव चुकविला नाहीं; व नेहमीं श्रीसांईसमवेत गर्क असावयाचे. सर्व आरत्यांना हे हजर असावयाचे. विशेषतः यांची आठवण शिर्डीकरांना, श्रीमहाराजांचा रथ व पालखी यांच्या मिरवणुकीच्या वेळीं होत राहील. उत्सवांच्या दिवसांत सोवळें नेसून सर्व पंक्तींना वाढतांना त्यांचा हंसतमुख चेहेरा नेहमीं साईभक्तांच्या परिचयाचा झालेला होता! उत्सवाच्या वेळच्या स्वैपाकघराची दुरुस्ती करावयास पाहिजे म्हणून फारा दिवसांची मागणी! कारण पूर्वीच्या स्वैपाकघरांत धूर फार कोंडत असे! परंतु बाबांची लीला अशी कीं, तें स्वैंपाकघर दुरुस्त झालेलें कांहीं दादांना पाहण्याचा योग नव्हता.

कोठेंही श्रीबाबांच्या सेवेकरितां वाटेल तो शारीरिक कष्ट करण्याची हौस नि तयारी! आमच्या परमपूज्य मातापितरांच्याबरोबर, शिर्डी, शिरवळ, डहाणू, सातारा, चिंचणी, खंबालिया व द्वारका येथें नेहमीं कै. ती॥ दादा जात असत. चिंचणी येथें श्रीसाईशिवमंदिर बांधण्यांत आलें त्याचेंही बरेंचसें श्रेय कै. ती॥ दादांच्या निरलस, अविरत अशा श्रमांनाच आहे. आपल्या आयुष्याच्या शेवटपर्यंत त्यांनीं श्रीबाबांच्या सेवेशिवाय दुसरें ध्येय समोर ठेविलें नव्हतें व त्याकरितांच त्यांनीं आपलें आयुष्य वेंचिलें! त्यांचा स्वभाव अगदीं साधा व भोळा होता.

कै. ती. दादा हे संस्थान कमिटीच्या सुरुवातीपासून तिचे सदस्य होते व अलिकडे तीन वर्षे विश्वस्त होते. ते संस्थान कमिटीच्या सर्व सभांना अगत्यानें हजर असत. दि. ११–४–४८ ला संस्थान कमिटीची सभा सांताक्रूझ येथें झाली. त्या सभेला हजर नव्हते. ते आजारी होते असें कळलें म्हणून दुसरे दिवशीं संस्थान कमिटीचे विनोदी पण उपकारी सदस्य श्री. विठ्ठलराव कामत कै. ती॥ दादांचे घरीं वांद्रे येथें गेले. तेथें त्यांना कै. ती॥ दादांची स्थिति चांगली नव्हती असें आढळून आलें म्हणून ते ऑफिसमधून लवकर:निघून वांद्याला गेले त्यावेळेला कै.ती॥ दादा श्रीसांईचरणीं विलीन झाले होते! श्री. कामत यांना कै. ती॥ दादांच्या स्मशानयात्रेला जाण्याचें पुण्य लाभलें! श्रीसांई कै. ती. दादांच्या आत्म्यास आपल्याजवळ निरंतर सुखशांतींत ठेवतील याबद्दल शंका नाहीं! त्यांच्या मृत्युमुळें झालेल्या दुःखांत सर्व सांईभक्त सहभागी आहेत!

---

**(३) कै. श्री. गोविंद काशिनाथ उर्फ अप्पासाहेब गाडगीळ बार ॲट लॉ– (मृत्यु पुणें येथें दि. २–६–४८).**

श्री. अप्पासाहेबांचा व त्यांच्या घरांतील मंडळींचा व आमचा परिचय फार जुना. परंतु माझा व त्यांचा विशेष संबंध, मी शिर्डीसंस्थान कमिटींत चिटणीस म्हणून काम करावयास लागल्यापासून आला. ते कमिटीचे सभेचे वेळी असल्यावर सभेचें काम सुरूं झालें म्हणजे कमीत कमी १०–१२ तास सहज चाले. परंतु हा सर्व वेळ श्री. अप्पासाहेब अत्यंत उत्साहानें, बसत असत. त्यांची ह्या वयांतील ही चिकाटी व काम करण्याची वृत्ति बघितली म्हणजे खरोखरच मला आश्चर्य वाटे! त्यांची सडसडीत व कृश मूर्ती बघितली म्हणजे त्यांत येवढा दांडगा उत्साह व चिकाटी असेल अशी कल्पना येत नसे!

श्री. अप्पासाहेबांचा व पुणें येथील बऱ्याचशा सार्वजनिक संस्था यांचा, सदस्य, अध्यक्ष, उपाध्यक्ष म्हणून बराचसा जवळचा संबंध होता असें समजतें; शिर्डी संस्थानचे, श्री. अप्पासाहेब हे कांहीं दिवस चिटणीस होते. अलीकडे २ वर्षें अध्यक्ष होते.

अलीकडे गेलेले ८–९ महिने श्री. अप्पासाहेबांचे व कमिटीच्या सर्व सभासदांचे कांहीं विशिष्ट विषयांबाबत मतभेद झाले होते. परंतु श्री. अप्पासाहेबांचे व सर्व सभासदांचे वैयक्तिक संबंध खरोखरच चांगले होते. ते व मी नगर कोर्टांतून शिर्डीला श्रीरामनवमीच्या उत्सवाकरितां एकाच मोटारनें गेलों. मला माझ्या पूज्य मातोश्रींची प्रकृती ज्यास्त बिघडल्याची तार आली म्हणून ज्यास्त दिवस शिर्डीस राहतां आलें नाहीं; पण तेथें झालेली श्री. अप्पासाहेबांची भेट हीच शेवटची भेट ठरली.

श्री. आप्पासाहेब नेहमी मला म्हणत असत कीं 'मला निरायासानें मरण येणार आहे.' व तें मात्र त्यांचे बोल खरे ठरले. श्री. आप्पासाहेबांना मरण खरोखरच हेवा करण्यासारखें आलें. दि. १ रात्रींपर्यंत त्यांची प्रकृती चांगली होती पण एकाएकीं त्यानंतर त्यांची हृदयक्रिया बंद पडली व त्यांचें देहावसान झालें. मरणसमयीं त्यांचें वय सुमारें ७८ वर्षांचें होते!

श्री. आप्पासाहेबांच्या निधनानें, 'त्यांच्या अनुरूप अशा सहधर्मचारिणी वहिनीबाई गाडगीळ यांच्यावर वृद्धपणी मात्र दुर्धर प्रसंग ओढवला आहे यांत शंका नाहीं परंतु त्यांची या दुःखांत कमिटींतील सर्व सभासद व इतर सांईभक्त सहभागी आहेत! श्री. आप्पासाहेबांच्या आत्म्याला श्रीसांई महाराज हे आपल्या दिव्यचरणीं सुखांत व शांतींत स्थान देवोत ही त्यांचे चरणीं नम्र प्रार्थना!

कळावें. श्रीसांई महाराजांनीं सर्वांना सुखांत व आनंदांत ठेवावें अशी प्रार्थना करून संपवितो.

आपला नम्र,
**श्रीपाद बा. देव**
चिटणीस शि. सं. कमिटी

---

# —:शिर्डीवृत्त:—

**फेब्रुवारी:—**

या महिन्यांत नेहमींप्रमाणें श्रींचे दर्शनास बाहेरचे बरेच भक्त आले होते. धर्मकृत्य वगैरे विधी रोजच्याप्रमाणें पार पडले.

बाहेरगांवचे कीर्तनकार श्री. ह. भ. प. कनैया पंतलु मद्रास व श्री. ह. भ. प. केशवदास बुवा सिकंदराबाद यांचीं किर्तनें श्रींचे मंदिरांत झालीं संस्थान गवयांची या महिन्यांत तीन कीर्तनें झालीं. नवल विशेष:-ता. १२-२-४८ रोजीं महात्मा गांधीजी यांचे दिनानिमित्त गोरगरीबांस अन्नदान व महात्मा गांधी यांचे जीवनावर भजन-कीर्तन वगैरे कार्यक्रम झाले. श्री. कोठेकर मास्तर पुणतांबे यांनीं श्रीपुढें संगीत गायनाची हजेरी दिली.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

---

**मार्च:—**

या महिन्यांत नेहमींप्रमाणें श्रींचें दर्शनास बाहेरचे बरेच भक्त आले होते. धर्मकृत्य वगैरे विधी रोजच्याप्रमाणें पार पडले.

संस्थान गवई यांची श्री तुकाराम बीज श्री एकनाथ षष्टी व दोन एकादशा मिळून चार कीर्तनें या महिन्यांत झाली.

मुंबई सरकारचे गृहमंत्री ना. मोरारजी देसाई हे श्री सहजानंद स्वामींसह शिर्डीस ता.९-३-४८ रोजीं श्रींचें दर्शनास आले होते त्यावेळीं संस्थानचे म्या. ट्रस्टी श्री. वसंतराव गोरक्षकर,ट्रस्टी नोगशराव सावंत व खजिनदार श्री. विनायकराव वैद्य हजर होते. यांनीं त्यांना संस्थानची माहिती देऊन सन १९४६ चा वार्षिक रिपोर्ट व इतर पुस्तकें दिलीं. श्री.

विनायक अ. सवाई माळीनगर, सोलापूर व श्री. पांडुरंग स. दीक्षित यांनीं श्रीपुढें गायनाची हजेरी दिली. त्याचप्रमाणें सिनेमा तारका श्री. स्नेहप्रभा प्रधान, मुंबई यांनीं श्रीपुढें संगीत भजन गायनाची हजेरी दिली.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

---

# —:श्रीसाईनाथ प्रसन्नः—

श्रीसद्गुरु साईनाथ महाराज शिर्डी. अहमदनगर यांचा सालाबादप्रमाणें रामनवमी उत्सव श्रींचे शिर्डी येथील मंदिरांत ता. १६, १७ व १८ एप्रिल १९४८ या दिवशीं साजरा करण्यांत आला.

ता. १६-४-४८ रोजीं नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त भक्तांस तीर्थप्रसाद, कीर्तन व रात्री पालखीची मिरवणूक निघाली होती. कीर्तन ह. भ. प. दासगणु यांचे शिष्य ह. भ. प. अनंत आठवले यांनीं केलें.

ता. १७-४-४८ रोजीं नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळीं कावडी मिरवणूक होऊन श्रींचे मंगलस्नान झालें. नंतर रामजन्माचें कीर्तन वगैरे होऊन तीर्थप्रसाद देणेंत आला. नंतर रात्रौ रथाची व निशाणांची मिरवणूक होऊन शोभेची दारु उडविण्यांत आली. नंतर मुंबईच्या रेडियोस्टार श्रीमती फिरोजबाई दस्तूर यांचें लाऊडस्पिकरवर सुश्राव्य गायन झालें.

ता. १८-५-४८ या उत्सवाच्या शेवटच्या दिवशीं नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त नगर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. सहजानंद स्वामी यांचें लाऊडस्पिकरवर व्याख्यान झालें नंतर श्री. संस्थान गवई यांचें गोपाळकाल्याचें कीर्तन होऊन उत्सव संपल्याचें जाहीर करण्यांत आलें. रात्रौ येथील शाळेंतील मुलांनीं बसविलेल्या 'सिंहगड' या नाटकाचा प्रयोग दाखविण्यांत आला.

या उत्सवास सालाबादप्रमाणें बाहेरगांवचे दोन तीन हजारांवर भक्त मंडळी हजर होती. त्यांची सोय संस्थाननें योग्यप्रकारें ठेवलेली होती.

मुंबईचे सुप्रसिद्ध चित्रकार व संस्थान कमिटीचे एक सभासद श्री. म. धों. कांबळी व त्यांची मित्र मंडळी यांनीं उत्सवाचे वेळीं लाउडस्पिकर लाऊन उत्सवांतील कार्यक्रम सुशोभित केलें.

ऑ. चिटणीस

श्रीसाईलीला त्रैमासिकची वार्षिक वर्गणी रु. २-४ पोस्टेज धरून आहे. ज्या कोणास वर्गणीदार होणें असेल त्यांनीं मॅनेजर श्रीसाईबाबा शिर्डी संस्थान पोष्ट शिर्डी जि।। अहमदनगर यांजकडे वर्गणी मनिऑर्डरनें पाठवावी व कुपनवर नांव व पत्ता सुवाच्य लिहावा. अंकासंबंधीं व इतर कांहीं तक्रार असेल तर ऑ. चिटणीस श्रीसाईबाबा शिर्डीसंस्थान, ५० नेताजी सुभाष रोड, ठाणा ( जी. आय. पी. रेल्वे ) ह्या पत्त्यावर करावा.

फक्त ज्या कोणास आपले साईबाबाबद्दलचे अनुभव साईलीलेंत. द्यावयाचे असल्यास त्यांनीं सुवाच्य लिहून संपादक साई लीला डॉ. के. बी. गव्हाणकर काळाचौकी रोड, मुंबई १२ ह्या पत्त्यावर पाठवावे इतर कोणाकडे पाठवूं नये.

श्री. बा. देव

ऑ. चिटणीस

# श्री· साईबाबा शिरडी संस्थानांत

## विक्रीकरितां असलेलीं पुस्तके

—o—

| | | |
|---|---|---|
| १ | श्री साई सच्चरित्र [ मराठी ] | किं. रु. ७-०-० |
| २ | सच्चरित, [ इंग्रजी ] | ४-०-० |
| ३ | दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवनमंजरी | ०-२-६ |
| ४ | ,, [ अध्याय ४ था ] | ०-८-० |
| ५ | सगुणोपासना | ०-३-० |
| ६ | प्रधानकृत पुस्तक [ इंग्रजी ] | १-४-० |

वरील पुस्तकांकरितां व बाबांचे विश्वासनीय निरनिराळ्या साईजच्या फोटो वगैरेकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

म्यानेजर, **शिरडी संस्थान**, मु. शिरडी, पो. रहातें, जि. **अहमदनगर.**

श्री. वि. आ. वैद्य मु. चाचडची चाळ, वरसावा रोड, अंधेरी **मुंबई.**

श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटी तर्फे

संपादक :– **डॉ. के. भ. गव्हाणकर** यानी, काळाचौकी रोड, मुंबई १२ येथें प्रसिद्ध केलें.

मुद्रक :– **के. एन. साफळे**, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस ज्यूडेक्स बिल्डिंग, त्रिभुवन रोड, **मुंबई ४.**